# स्वावलंबी व्हायला शिका: ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक वसंत हुदलीकर यांचे प्रतिपादन





मेट्स भुजबळ नॉलेज सिटी येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात नुकताच एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ रोजी आयोजित ह्या कार्यक्रमा मध्ये वसंत हुदलीकर यांनी आपल्या स्वातंत्र्य लढ्यातील अनेक आठवणींना उजाळा दिला.

विद्यार्थ्यांना संबोधीत करतांना हुदालीकारांनी स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय व ते कसे मिळाले आणि भारत स्वतंत्र होवून ७० वर्षानंतरही काही रूढी व परंपरा कश्या बाधक आहेत हे समजावून सांगितले. आजच्या तरूणासामोरील आव्हाने व त्याची सामाजिक बांधीलकी यांची जाणीव करून देतांना हुदलीकर यांनी संत गाडगे बाबांच्या स्वावलंबन, धर्मनिरपेक्षता व स्वच्छता या त्रिसूत्रीचे महत्व विषद केले.

वयाच्या ९३व्या वर्षीसुद्धा अतिशय उत्साहीपणे हुदलीकर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व मुक्त संवाद साधला. सदर केलेल्या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. सुशील पाटील व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. पवन उदावंत यांनी केले व त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन मिळाले.